पुणे ४११ ००१.

अनुक्रमणिका

.... २

x x x x x x

प्र क र ण - १.

पार्श्वभूमी

प्रास्ताविक

१.१ भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकासासाठी पंचवार्षिक योजना हाती घेण्यात आल्या. या पंचवार्षिक योजनेत विकासाचा केंद्रबिंदू "व्यक्ती" समजून व्यक्ती - समाज - विभाग असा विकासाचा क्रम ठरविण्यात आला. परंतु "व्यक्ती" हा केंद्रबिंदू मानून विकास योजना परिणामकारक होऊ शकत नाही हे निदर्शनास आल्यानंतर यासाठी त्या व्यक्तीचा परिसर बदलणे आवश्यक आहे असे धोरण ठरविण्यात आले. क्षेत्र विकासाप्रमाणे व्यक्तीचाही विकास होईल असे मानून क्षेत्र विकास विचार प्रणाली अंमलात आली.

१.२ शिक्षणाच्या माध्यमातून "एकात्मिक क्षेत्रविकास योजना" व त्यातून आदिवासींचा वि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने स.क.सं.का.क्री.व प. विभाग शासन निर्णय क्र. बीसीपी १०७२/३८९३-जी, दिनांक १४ ऑगस्ट १९७२ अन्वये क्षेत्रीय सुधारणा कार्यक्रम हाती घेतला.

१.३ आश्रमशाळा ही आदिवासींच्या विकासासाठी केंद्रबिंदू मानून साधारणत: ५००० ते ७००० लोकसंख्येचा परिसर एका आश्रमशाळेच्या कक्षेत असावा व त्यात बालवाडी, कृषि प्रात्यक्षिक केंद्र, आरोग्य चिकित्सा केंद्र, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र यांचा समावेश असावा असे धोरण सुरुवातीस ठरविण्यात आले.

१.४ आश्रमशाळा ही निवासी संस्था करून त्यातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, राहण्याची व जेवण्याची व्यवस्था, पुस्तकी ज्ञानाबरोबर शेती विषयाबाबत प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात यावे अशी या मागील कल्पना होती.

१.५ या योजनेंतर्गत प्रत्येक आश्रमशाळेला जोडून ३० ते ४० आदिवासी मुलां/ मुलींसाठी बालवाडी असेल. त्यासाठी प्रशिक्षित व पूर्णवेळ शिक्षिका राहील. बालवाडीतील आवश्यक ते साहीत्य शासन उपलब्ध करून देईल.

१.६ तीन आश्रमशाळा समूहाच्या केंद्रठिकाणी एक आरोग्य पथक राहील. ज्याद्वारा त्या परिसरातील तथा आश्रमवासीय मुला/ मुलींचे आरोग्य प्रतिबंधक उपाय आणि उपचार केले जातील. सदरील आरोग्य पथक हे सर्व सोयी-युक्त परिपूर्ण राहील.

१.७ तसेच व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण हे या योजनेतील महत्वाचे अंग राहील. यांत दरवर्षी ३० प्रशिक्षणार्थिंना/एकाच वेळेस प्रवेश मिळून सुतारकाम, लोहारकाम शिलाईकाम इ. प्रकारचे प्रशिक्षण शिक्षणाबरोबरच देण्यात येऊन त्यांना दरमहा विद्यावेतन देखिल देण्यात येईल, जेणेकरून ते प्रशिक्षणानंतर स्वावलंबी बनू शकतील.

१.८ या योजनेअंतर्गत अंदाजे ५० एकर जमिनीचे कृषि प्रक्षेत्रात रूपांतर करून त्याचा फायदा परिसरातीलआदिवासी शेतकरी आणि आश्रमवासीय विद्यार्थ्यांना कसा होईल, ज्याद्वारे सुधारीत शेती पध्दती, बी-बीयाणे आणि किटकनाशके यांचा वापर कसा करावा हयाचे मार्गदर्शन केले जाईल.

१.९ कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या ठिकाणी १० गाईंचे संगोपन केले जाईल आणि त्यापासून मिळणारे दूध आश्रमवासीय विद्यार्थ्यांकरता विकले जावे अशी संकल्पना आदेशाद्वारे निर्गमित करण्यात आली. अशाप्रकारे या सर्व सोयीयुक्त व्यवस्था करून त्या प्रात्यक्षिक केंद्राकरिता लागणारा सेवकवर्ग तसेच आवश्यक इतर खर्च यांवर वार्षिक किती रक्कम खर्च करावे, हेही या आदेशाद्वारे स्पष्ट करण्यात आले. प्रस्तावित एका कृषि प्रात्यक्षिक केंद्राकरिता त्यावेळचा वार्षिक खर्च पुढिल-

प्रमाणे ठरविण्यात आला :

			रुपये
अ]	नोकरवर्ग पगार		
१.	शेती अधिकारी		५,४००/-
२.	वरिष्ठ लिपीक		३,६००/-
३.	माळी		३,०००/-
४.	सालदार		३,०००/-
		एकूण रु.	१५,०००/-
ब]	मशागतीचा खर्च		१०,०००/-
क]	औजांचे लंगोपन		७००/-
ड]	कार्यालय, गोदाम, औजारे व जनावरांसाठी शेड, विहीरीवर पंप हाऊस		४१,४००/-
इ]	निवास इमारतीसाठी		३७,७२०/-
फ]	बैलजोडी		२,०००/-
ह]	शेती औजारे		५,५००/-
ज]	जमीन सुधारणा		४०,०००/-
		एकूण रु.	१,३७,३२०/-
		अधिक	१५,०००/-
			१,५२,३२०/-

१.१० महाराष्ट्रात एकूण ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्राकरिता शासन निर्णयानुसार वन/महसूल/पाटबंधारे खात्याकडून तसेच खाजगी रित्या ८९६.४७ हेक्टर जमीन मिळविण्यात आली. आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३८ व उपयोजनेबाहेरील क्षेत्रात १३ अशा एकूण ५१ आश्रमशाळांमध्ये कृषि प्रात्यक्षिक केंद्र सुरु करण्यात आली. इमारती उपलब्ध करून मशागतीसाठी लागणारी औजारे देण्यात आली, पशुधनाचा पुरवठा करण्यात आला, कृषि अधिकारी, माळी व सालदार यांची नेमणूक करण्यात आली. सुधारीत बी-बियाणे, खते व किटक नाशके यांचा पुरवठा केला व याप्रमाणे शेती प्रात्यक्षिक केंद्रातील कामकाज सुरु झाले.

....४

१.११ कृषि खात्याकडून कृषि अधिका-यांची पदे वर्ग करून भरण्यांत आली व सालदारांचे पद[ठराविकरकमेत] आदिवासी विकास अधिकारी यांचेमार्फत भरण्यात आले. कृषि अधिकारी यांनी आदिवासी विकास अधिका--यांशी संपर्क ठेवून कृषि केंद्रे कार्यान्वयीत होण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरू केले.

१.१२ महसूल/वन खात्याकडून प्राप्त झालेल्या बहुसंख्य जमिनी हलक्या व कमी प्रतीच्या होत्या. पाण्याची बारमाही सुविधा देखील उपलब्ध होऊ शकली नाही. इतकेच नव्हे तर जमिनीचा बहुतांश भाग खडकांनी तथा वनसंपत्तीने व्यापलेला असल्याने, पाहिजे तशी मशागती करीता सपाटीकरण व बांधबांधस्ती करता आली नाही. तसेच कायम स्वरूपी कुपणाची सोय नसल्याने पेरलेल्या क्षेत्रातील खरीप पिकास जंगली जनावरांचात्रास होऊन उत्पन्नात घट झाली. सुधारीत शेती औजारांचा पुरवठा अपुरा ठरला. कृषि खात्याकडून/ कृषि विद्यापीठाकडून अपेक्षित तांत्रिक मार्गदर्शन घेण्यास, संबंधित अधिका-याद्वारा प्रयत्न कमी झाल्याने बहुतेक केंद्रावर उत्पन्नापेक्षा अधिक खर्च होवू लागला. योजनेचा मूळ हेतू "आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना, आदिवासी शेतक-यांना शेती प्रात्यक्षिके दाखविणे" ह्यातही मुख्याध्यापक आणि कृषि अधिकारी यांच्यात योग्य समन्वय नसल्याने मूळचा उद्देश बाजूला राहिला.

१.१३ महाराष्ट्रात दिवसेंदिवस शासकीय आश्रमशाळांची मागणी वाढल्याने तद्वतच धोरणानूसार आवश्यक तेवढी जमीन मिळू न शकल्याने शासकीय आश्रमशा-ळांची संख्या ३२५ च्या वर जावूनही फक्त ५१ ठिकाणीच कृषि प्रात्यक्षिकक केंद्राकरिताच जमिनी प्राप्त झाल्या. पर्यायाने सातत्याने ६० एकर जमीनीची मर्यादा शिथिल करून ती कमी करण्यात आली.

१.१४ शासकीय आश्रमशाळांची मागणीनुसार होणारी वाढ, चालू केलेल्या ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची असमाधानकारक प्रगती यामुळे नाईला-जास्तव एक एक करतां ४४ कृषि प्रात्यक्षिक केंद्रे बंद झालीत.

....५

१.१५ शासकीय धोरणांत मंजूर केलेले आरोग्य पथक, पशुपालन केंद्र, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था यांनाही चालना न मिळल्याने ती चालू होवू शकली नाहीत आणि परिणामत: फक्त आश्रमशाळा हीच संस्था कार्यान्वयीत राहीली.

१.१६ या संस्थेने या सर्व बाबींची कारणमिमांसा जाणून घेण्याकरिता व या क्षेत्राचा सखोल अभ्यास करण्याकरिता हा विषय निवडला.

प्र क र ण २.

पाहणीची उद्दिष्टे, कार्यपध्दती व व्याप्ती :

२.१ एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रमासंबंधी महाराष्ट्र शासन निर्णय स.क. सं.का.क्री व प. व विभाग क्र.बीसीपी-१०७२/३८९३/जी. दिनांक १४-८-१९७२ द्वारा दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक १.४.९० रोजी शासकीय आश्रमशाळेपैकी ५१ शाळेत शेतकी प्रात्यक्षिक केंद्र सुरु करण्यात आली. ज्या शासकीय शाळेच्या परिसरासाठी वन/महसूल व पाटबंधारे खात्याकडून जमिनी प्राप्त झाल्यात अशा ठिकाणी कृषि प्रात्यक्षिक केंद्र निर्माण करून कार्यान्वयीत होणा-या दृष्टिने कार्यवाही सुरु झाली. आश्रमशाळा समूहासाठी सुरुवातीला वन खात्याकडून आवश्यक इमारती बांधून मशागतीसाठी लागणारी औजारे देण्यात आली. कृषि अधिकारी, माळी व मालदार यांच्या नेमणूका करण्यात आल्या. सुधारित बियाणे, खते व किटकनाशके, कृषि अधिका-यांना देण्यात आली. परंतु बहुतेक कृषि प्रात्यक्षिक केंद्राची विकासात्मक कामे अथवा बाहेरील प्रगत कृषि विद्यापीठातील ज्ञानाचा काहीही फायदा करून न घेतल्याने त्याचा विपरित परिणाम केंद्रावर झाला.

२.२ शासनाच्या उदात्त मूलभूत हेतूप्रमाणे आश्रमशाळेतीलविद्यार्थ्यांना व परिसरातील आदिवासी शेतक-यांना शेती प्रात्यक्षिकांचा काहीही लाभ मिळाला नाही व अशा ~~४१~~ ५१ प्रकारे कृषि प्रात्यक्षिक केंद्रांपैकी ४४ केंद्रातील कामकाज बंद झाल्याचे आढळले. ७ केंद्रातील कार्य कृषि अधिका-याविना अद्याप चालू आहे, म्हणून राहिलेल्या कार्याचे पुनर्विलोकन होण्याचे हेतुने प्रस्तुतचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आहे.

२.३ वर्ष १९८८-१९८९ अखेरीस महाराष्ट्र राज्यातील एकूण ३३४ शासकीय आश्रमशाळांपैकी उपयोजना क्षेत्रातील ३८ व उपयोजना क्षेत्राबाहेरील १३ अशा एकूण ५१ आश्रमशाळा समूहाला जोडून कृषि प्रात्यक्षिक केंद्र आहेत. या केंद्रची जिल्हानिहाय व विभाग निहाय माहिती परिशिष्ट क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

२.४ शासकीय आश्रमशाळा समूहातील कृषि प्रत्यक्षिक केंद्रासाठी उपलब्ध असणा-या जमीनीच्या वापरासंबंधी सर्विस्तर प्रश्नावली तयार करून ती भरून पाठविण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधीत आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना देण्यात आल्या होत्या. त्यांचेकडून पत्रकातील नमुन्याप्रमाणे माहिती गोळा केली. सह्याद्री विभागातील नाशिक, ठाणे, धुळे व गोंडवन विभागातील गड-चिरोली, यवतमाळ, नांदेड या जिल्ह्यातील आश्रमशाळांना समक्ष भेटी देवून दिलेली माहिती पडताळून पाहिली व कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील जमीनींची पाहणी केली.

२.५ आदिवासी विकास अधिकारी व शेती केंद्राशी संबंधित मुख्याध्यापक यांचेशी संपर्क साधून प्रात्यक्षिक केंद्रातील उणीवा यांची सर्विस्तर चर्चा करून त्यांनी दिलेल्या सूचनांची नोंद अहवालात घेण्यात आली.

....८

प्र क र ण - ३.

पाहणीतील दृश्ये.

३.१ आपला देश शेती प्रधान असल्याने "शेती" हा अर्थव्यवस्थेचा फार मोठा आधारभूत पाया आहे. प्रत्यक्ष उत्पादनात सुपीक जमीन व साधन सामुग्रीला फार महत्त्व आहे. विशेषत: पाणीपुरवठा, खते, बी-बियाणे व सुधारित अवजारे इत्यादी उत्पादन साधनांचा यथायोग्य वापर केला तरच उत्पादनात वाढ होत असते. त्यातल्या त्यात या बाबींची तांत्रिक मार्गदर्शनाची फार गरज आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना अशा तंत्रज्ञाची मदती कोणीही नाकारणार नाही. अशा अविकसीत भागात शेती विकासाचे तंत्र पोहोचविण्याचे अवघड काम काही प्रात्यक्षिक केंद्रांमार्फत केले जाते. अशा शासकीय आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची स्थिती कशी आहे याचे निवेदन या प्रकरणांत करण्यात आले आहे.

३.२ कृषि प्रात्यक्षिक केंद्रची विभागणी :-

महाराष्ट्र राज्यात १-४-८९ अखेर एकूण ३० जिल्ह्यांपैकी २४ जिल्ह्यात ३३४ आश्रमशाळा आहेत. ३३४ आश्रमशाळांपैकी २१७ आश्रमशाळा ह्या सह्याद्री विभागात तर ११७ या गोंडवन विभागात आढळतात. कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या शासकीय आश्रमशाळांच्या बाबतीत महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांपैकी १८ जिल्ह्यात आश्रमशाळेला जोडून कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेले शाळा समूह आहेत. त्यापैकी सह्याद्री विभागात ३३ व गोंडवन विभागात १८ अशी ५१ प्रात्यक्षिक केंद्रांची विभागणी आढळते.

सह्याद्री विभागात नाशिक मध्ये ७, धुळ्यामधे ६ तर ठाणे व कळगांव जिल्ह्यामध्ये प्रत्येकी ४ शेती प्रात्यक्षिक केंद्र प्रामुख्याने आढळतात.

गोंडवन विभागात नांदेड व गडचिरोली जिल्ह्यामध्ये प्रत्येकी ५ कृषि प्रात्यक्षिक केंद्र आहेत. या शेती प्रात्यक्षिक केंद्रांचे एकूण शासकीय आश्रमशाळेचे प्रमाण काढले तर ते जवळपास ६ : १ असे येते याची विभागणी उपयोजना क्षेत्रात व उपयोजना क्षेत्राबाहेर कशी आहे हे पाहिले असता ३८ शेती प्रात्यक्षिक केंद्र ही उपयोजना क्षेत्रात व १३ उपयोजना ~~क्षेत्राबाहेर~~ बाह्यक्षेत्रात आहेत. या आश्रमशाळा समूहाच्या विभागणीचे प्रमाण उपयोजना व उपयोजना बाहेर क्षेत्राशी साधारणत: ३ : १ असे आहे.

तालुका निहाय व गाव निहाय आश्रमशाळांची माहिती या अहवालांच्या शेवटी जोडलेल्या परिशिष्टक्र. १ मध्ये देण्यात आलेली आहे. याचा अभ्यास केला असता असे आढळते की कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळांची विभागणी असंतुलीत झालेली दिसते. आश्रमशाळेत जोडून कृषि प्रात्यक्षिक केंद्र सुरु करण्यासंबंधी काही ठराविक निकष लावलेले दिसत नाहीत. लोकसंख्येच्या प्रमाणात किंवा अन्य काही उद्देश डोळ्यापुढे ठेवून कृषि प्रात्यक्षिक केंद्र सुरु केल्याचे दिसत नाही. ज्या ज्या ठिकाणी जमिनी उपलब्ध झाल्यात त्या ठिकाणी कृषि प्रात्यक्षिक केंद्र सुरु केली आहेत असे दिसते. त्यामुळे मानकानुसार केंद्र सुरु करण्याच्या पाठीमागे जे मूलभूत उद्देश आहेत. त्याची सफलता कोठेही झालेली आढळत नाही. खरे पाहिले तर काही ठरावात तत्वे डोळ्यासमोर ठेवून कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची स्थापना करणे जरुरीचे होते असे वाटते. काही तत्वे डोळ्यासमोर ठेवून अशा आश्रमशाळेचे नियोजन करण्याची गरज होती.

महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकासभागाव्यतिरिक्त इतर म्हणजे शेतकी खात्याकडून घेतल्या जातअसणा-या केंद्राची व या आश्रमशाळेंचा समन्वय कोठेही झालेला आढळत नाही.

३.३ <u>जमिनीची प्राप्ती</u> :-

कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळांच्या जमिनी वेगवेगळ्या खात्याकडून व खाजगी व्यक्तीकडून वर्ग करण्यात आल्या आहेत. या जमिनी संबंधित खात्याने आदिवासी विभागाकडे वर्ग केलेल्या आहेत.

.... १०

काही जमिनी विकत घेण्यात आलेल्या आहेत, तर काही जमिनी दान रूपाने आश्रमशाळांना मिळालेल्या आहेत. वेगवेगळ्या खात्याकडून मिळविलेल्या जमिनीचे क्षेत्र व वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :

अ.क्र.	खाते	प्राप्त केलेली जमीन [हेक्टर]	मिळालेल्या जमिनीचे एकूण जमिनीशी प्रमाण
१.	महसूल	४२५.१९	४७.४३
२.	वन	४२६.०५	४७.५३
३.	खाजगी व्यक्तीकडून व इतर खात्याकडून	४५.२३	५.०४
	एकूण :	८९६.४७	१००.००

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की कृषि प्रात्यक्षिक केंद्रास मिळालेली जमीन ही बहुतांशी महसूल व वन खात्याकडून प्राप्त झालेली आहे.

सह्याद्री विभागातील जमिनीचे क्षेत्र ५१३.४४ हेक्टर असून गोंडवन विभागातील क्षेत्र ३९३.०३ हेक्टर आहे. प्रात्यक्षिक केंद्राच्या ताब्यात असलेली सर्वात जास्त जमीन नाशिक जिल्ह्यात आढळते. त्या खालोखाल गोंडवन विभागातील नांदेड व गडचिरोली जिल्ह्यातील आश्रमशाळांना जमीनी प्राप्त झालेल्या आढळतात.

या ५१ आश्रमशाळांच्या समूहात ८९६.४७ हेक्टर जमीन आहे. या जमिनीचे सरासरी प्रमाण काढले तर एका आश्रमशाळेत १७.५८ हेक्टर किंवा ४४ एकर जमीन उपलब्ध असल्याचे आढळून येते.

या संबंधीची विभागवार आकडेवारी पुढीलपानांवर परिशिष्ट क्र. ४ मध्ये देण्यात आलेली आहे.

३.४ जमिनीची मालकी :

महाराष्ट्र राज्यात ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या ताब्यातील सर्व जमिनीची मालकी आदिवासी विकास विभागाची आहे. परंतु यासंबंधीची एकत्रित माहिती कोठेही संकलीत झालेली आढळत नाही. या ५१ आश्रमशाळांचे संनियंत्रण आदिवासी विकास संचालनालयाकडून होते, परंतु याबाबतची अद्यावत माहिती त्यांचेकडेही उपलब्ध नाही व ती ठेवण्याचा फारसा प्रयत्नही झालेला दिसत नाही. त्यामुळे कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे दत्तऐवज किंवा त्यासंबंधीचे कागदपत्रे फार थोडया ठिकाणी उपलब्ध आहेत असे आढळते. खरे पाहिले असता या जमिनी ज्यावेळी आदिवासी विभागाकडे [सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा विभागाकडून] वर्ग झाल्या त्यावेळी त्यांची नोंद ७/१२ ला होणे आवश्यक होते. परंतु तसे अद्यापही काही ठिकाणी झालेले आढळत नाही. यामुळे ब-याच ठिकाणी शासकीय आश्रमशाळांच्या जमिनीवर अतिक्रमण झालेले दिसते. अशा जमिनींच्या काही भागांवर इतर लोक आपला हक्क दाखवून त्या जमिनीचा वापर करीत असताना आढळतात. काही ठिकाणी आश्रमशाळांच्या ताब्यात असलेल्या जमिनीची मोजणी झालेली दिसत नाही. अशा अतिक्रमण ~~झालेल्या~~ झालेल्या जमिनी त्वरीत ताब्यात घेणे जरूरीचे वाटते.

३.५ जमिनीचा प्रकार :

आश्रमशाळेत ज्या जमिनी प्राप्त झालेल्या आहेत त्यांचे त्यांच्या दर्जानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :

अ.क्र.	जमिनीचा दर्जानुसार प्रकार	क्षेत्र[हेक्टर]	एकूण क्षेत्राशी शेकडा प्रमाण
१.	भारी जमिन	८६.७२	१२.३२
२.	मध्यम जमिन	१७७.४४	२५.२०
३.	हलकी जमिन	२७५.६९	३९.१५
४.	खडकाळ जमिन	१६४.२९	२३.३३
	एकूण :	७०४.१४	१००.००

या आश्रमशाळा समूहांच्या ताब्यात असलेली एकूण जमिन ८९६.४७ हेक्टर आहे. यापैकी शाळा इमारती व क्रिडांगणे यासाठी १९२.३३ हेक्टर जमिन ठेवलेली आहे व राहिलेली ७०४.१४ हेक्टर जमिनीची क्षेत्र कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या उद्देशासाठी घेण्यात आलेले आहे.

वरील तक्त्यांवरून असे निदर्शनास येते की केवळ १२.३२ % जमिन सुपीक व भारी प्रतीची आहे.

मध्यम व हलक्या प्रतीच्या जमिनीचे प्रमाण ६४.३५% आहे. एकूण जमिनीच्या ७६.६७% जमिन ही शेतीस उपयुक्त आहे. फक्त ३३.३३% जमिन ही खडकाळ आहे. हिचा उपयोग शेती विकासासाठी फारसा होणार नाही, तथापी जमिनीचा अन्य कारणांसाठी उपयोग करून घेता येईल.

३.६ आश्रमशाळांचे स्थापनेनुसार वर्गीकरण :

प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळा समूहाची स्थापना १९७२ पासून १९७८ पर्यन्त झालेली आढळते. त्यांची वर्षनिहाय वर्गवारी खालील-प्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	स्थापन झालेल्या आश्रमशाळांची संख्या
१.	१९७२ – १९७३	३१
२.	१९७३ – १९७४	९
३.	१९७४ – १९७५	६
४.	१९७५ – १९७६	२
५.	१९७६ – १९७७	१
६.	१९७७ – १९७८	२
	एकूण:	५१

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९७२ – १९७३ या वर्षात या प्रकारच्या सगळ्यांत जास्त आश्रमशाळा समूह स्थापन झालेले आहेत. त्यानंतर अशा प्रकारची समूहे १९७८ पर्यन्त सुरु करण्यात आलेली दिसतात. १९७८-१९७९ नतर अशा प्रकारची आश्रमशाळा समूहेस्थापन झालेली नाहीत.

१९७२ च्या यासंबंधीत शासन निर्णयानुसार प्रत्येक कृषि प्रात्यक्षिक केंद्रास साधारणपणे ५० एकर जमिन तरतुद करण्यात आली होती. यासाठी एक शेती अधिकारी, एक वरिष्ठ लिपीक, एक माळी व दोन सालदार अशा पाच कर्मचा-यांची शाळेसाठी कायमस्वरुपी पदे निर्माण करण्यात आलेली होती. या प्रत्येक शाळेतील शेती प्रात्यक्षि केंद्रात वर्षासाठी रु. २५,८००/- ची आवर्त

....१४

बाबी खर्चासाठी तरतुद होती. जमिन विकत घेण्यासाठी, तिच्या विकासा-साठी व बांधकामासाठी जवळजवळ रु. १,४३,१२०/- ची तरतुद होती. या तरतुदीनुसार सुरुवातीला आश्रमशाळा समूह सुरु करण्यांत आले. सुरुवातील कृषि प्रात्यक्षिक केंद्राचे काम जोमात सुरु झाले. कृषि प्रात्यक्षिक केंद्रास जोडून दुग्ध व्यवसाय असल्यामुळे कृषि प्रात्यक्षिक केंद्रास हा पूरक विभाग जोडण्यांत आला. त्यामुळे ही प्रात्यक्षिक केंद्र १९७३-१९७४ पासून ख-या अर्थाने सुरु झाली. या केंद्राच्या मार्गदर्शनासाठी शेतकी अधिका-यांची नेमणूक करण्यात आली.

शासनाने पडीक जमिन वहिवाटीस आणणेसाठी प्रत्येक एकरामागे रु ५००/- खर्च करण्यास परवानगी दिली. त्यामुळे सुरुवातीस ही केंद्रे चांगल्या प्रकारे सुरु झाली. परिसरातील शेतक-यांना व आश्रमशाळेतील मुलांना त्यांचा चांगला उपयोग होवू लागला. अशीच केंद्रे मोठया प्रमाणांत वाढवावी असे शासनाचे प्रयत्नही जारी झाले. परंतु प्रात्यक्षिक केंद्रासाठी ५० एकर जमिन मिळणे पुढे पुढे दुर्मिळ होऊ लागले आणि त्यामुळे आश्रमशाळा समूह योजनेस वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

१९७८-१९७९ नंतर अशा आश्रमशाळा सुरु करण्याचे शासनाने थांबविले व आश्रमशाळेत मुलांना फक्त शिक्षण व निवासस्थान एवढया बाबी पुरविण्यांत आल्या.

सुरुवातीस कृषि प्रात्यक्षिक केंद्रासाठी शेतीची अवजारे घेण्यात आली. वेगवेगळ्या प्रकारचे हवामानात अनुकूल अशी पिके चांगल्या जमिनीत घेण्यांत आली, परंतु पुढे वेळेवर पैसा उपलब्ध न झाल्याने व चांगल्या देखरे-खीच्या अभावांमुळे ही प्रात्यक्षिक केंद्र तोटयात येऊ लागली. १९८६ - १९८७ पासून ही केंद्रे कायम स्वरूपाची जवळजवळ बंद होऊ लागली व सध्या ५१ केंद्रां-पैकी फक्त ७ केंद्रे चालू आहेत. शेतकी खात्यांच्या नियुक्तीवर असलेले अधिकारी परत त्या खात्याकडे वर्ग करण्यात आले. परंतु ज्या जागा रिक्त आहेत, त्यांचे जागी खात्याने अधिकारी नेमले नाहीत.

कृषि प्रात्यक्षिक केंद्राचे काम आश्रमशाळेतील एका शिक्षकाकडे देण्यात आले असून त्याचेवर देखरेख शाळेचे मुख्याध्यापक करीत असतात. परंतु स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने सर्व आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्र जवळजवळ बंद अवस्थेत आहेत. अशा या आश्रमशाळांच्या ~~पुपर्जीवनाची~~ पुनर्जीवनाची आज निकड आहे व जरूरीचे आहे.

३.७ <u>सामाजिक वनीकरण व फलोद्यान</u> :

महाराष्ट्र शासनाने सामाजिक वनीकरण व फलोद्यान ही योजना सुरू केली. या योजनेमध्ये सामाजिक संस्थेच्या ज्या पडीक जमिनी आहेत त्या जमिनीत झाडे लावून विकास करण्याच्या दृष्टिकोन यांत अंतर्भूत आहे. आश्रमसमूहातील कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील काही जमिनी या सामाजिक वनीकरण व फलोद्यान खात्यास वर्ग करण्यांत आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील कृषि प्रात्यक्षिक केंद्रास मिळालेल्या एकूण ८९६.४७ क्षेत्र हेक्टर जमिनीपैकी ३८३.३९ हेक्टर क्षेत्र सामाजिक वनीकरण व फलोत्पादन खात्यास वर्ग करण्यांत आलेले आहे. या क्षेत्राचे एकूण लागवडीलायक क्षेत्राशी प्रमाण ५४.४५ टक्के आहे. बाकीची राहीलेली जमीन ही आश्रमशाळेची आहे. सामाजिक वनीकरण व फलोत्पादन विभागाकडे जी जमिन वर्ग करण्यात आलेली आहे ती काही कालावधीपुरतीच आहे व ती पुन: आदिवासी विभागाकडे झाडांच्या जोपासनेसाठी व पुढील विकासासाठी लवकरच वर्ग करण्यांत येणार आहे. अशा सर्वच जमिनींची योग्यत्या विनियोगाची जबाबदारी खात्यावरच आहे.

तक्ता क्र. १

विभागनिहाय सामाजिक वनीकरण/फलोत्पादन योजनांतर्गत कृषि प्रात्यक्षिक केंद्रावर लावलेली झाडे.

अ.क्र.	झाडांचे नांव	सह्याद्री विभाग	कोंकण विभाग	एकूण
१.	सुबाभूळ	१९०९०	१३८४५	३२९३५
२.	निलगिरी	४७४४०	१३९५६	६१३९६
३.	शिसव	८४११	८५००	१६९११
४.	काजीद	८७३०	२१५४३	३०२७३
५.	कडूलिंब	५३२५	१२४४	६६६९
६.	गिरल	४१००	१३९१०	१८०१०
७.	बांबू	२५६०	६०००	८५६०
८.	अशोक	–	१००	१००
९.	साग	२००	४२४५	४४४५
१०.	चिंच	३०००	८००	३८००
११.	आंबा	१३२२५	१९९७	१५२२२
१२.	सिताफळ	१८२००	१३९१०	३२११०
१३.	कवठ	५०	५००	५५०
१४.	पेरू	–	२२५०	२२५०
१५.	बोर	२७००	११६०	३८६०
१६.	ओकलिया	–	२५१९०	२५१९०
१७.	प्रायोपित व इतर	४४३११	१७७९४	६२१०५
	एकूण :	१७७३४२	१४७०४४	३२४३८६

.... १७

वरील योजनांतर्गत ३८३.३९ हेक्टर क्षेत्रामध्ये एकूण ३,२४,३८६ झाडे लावण्यांत आली आहेत. त्यात सागासारखी मौल्यवान झाडांचाही समावेश आहे. सगळ्यात अधिक झाडे निलगिरीची आढळतात. तर त्या खालोखाल सिताफळ व सुबाभळीची लागवड झालेली दिसते. प्रत्यक्ष काही आश्रमशाळांना भेटी दिल्या असता असे आढळले की वरीलपैकी ४० ते ५० टक्के झाडे जगली आहेत. पाहणीचे वेळी अदमासे १,५५,००० झाडे जिवंत असल्याचे आढळले. बाकीच्या जमिनीवर ५० ते ६० टक्के झाडे मेलेली आहेत. त्याशिवाय नवीन झाडे लावून ती वाढविण्याचा फारसा प्रयत्न झालेला दिसत नाही. ब-याच ठिकाणी जमिन ओसाड पडलेली आढळते.

सामाजिक वनीकरण व फलोत्पादन खात्याकडे दिलेली जमिन ही आदिवासी विकास विभागाकडे लवकरच वर्ग होणार आहे व त्यापुढे या जमिनीत लावलेल्या झाडांची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी आदिवासी खात्यावर येणार आहे.

३.८ <u>बागायती सुविधा :</u>

शेती प्रात्यक्षिक केंद्राच्या विकासासाठी विहीरीचे पाटबंधा-यांच्या पाण्याचे महत्व कोणीही नाकारणार नाही. सध्या ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्रांपैकी फक्त काही प्रात्यक्षिक केंद्रात विहीरीच्या पाण्याचा बागायती शेतीसाठी उपयोग केला जातो व ही बागायत बहुतांशी किफायतशीर झालेली आहे. त्यामुळे जिरायत शेतीवर असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रच्या आश्रमशाळा ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे तेथे बागायती करण्यात आलेली दिसून येते. बागायत क्षेत्र असलेल्या अशा आश्रमशाळा समुहांची भाजी लागवडीची उपयुक्तता सर्वांना पटू लागली आहे. त्यामुळे जिरायत जमिनीचे रूपांतर बागायत जमिनीमध्ये करणे हा एक महत्वाचा उपक्रम आश्रमशाळा समुहासमोर आहे. याबाबत चौकशी केली असता शेती प्रात्यक्षिक केंद्रावर अन्य ठिकाणी पाणी उपलब्धता असावल्याचे २१ आश्रमशाळांनी सांगीतले आहे.

....१८

सध्या ५१ आश्रमशाळांपैकी १५ आश्रमशाळा हया विहीरीच्या पाण्याचा उपयोग बागायतीसाठी करतात. ८ आश्रमशाळा नदीच्या पाण्याचा उपयोग, ९ शाळांमधून नाल्यांच्या पाण्याचा उपयोग व १ आश्रमशाळेमधून पाट-बंधा-याच्या पाण्याचा उपयोग करून बागायती पिके काढण्याचा उपक्रम करित आहेत. जवळ जवळ ३१ आश्रमशाळा या ना त्या प्रकारे नैसर्गिक पाण्याचा उपयोग करून जिरायत जमिन बागायत क्षेत्राखाली आणण्याच्या प्रयत्नात आहेत. बागायतीसाठी विविध साधनांचा उपयोग घेत असलेल्या आश्रमशाळेचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	बागायतीचे साधन	आश्रमशाळांची संख्या	शेकडा प्रमाण
१.	विहीर	१५	४५.४५
२.	नदी	८	२४.२४
३.	नाला	९	२७.२८
४.	पाटबंधा-याने	१	३.०३
	एकूण	३१	१००.००

वरील तक्त्यांवरून असे दिसते की विहीर बागायतीस कृषि प्रात्यक्षिक केंद्रास वाव आहे. काही ठिकाणे नदी व नाल्याचा पाण्याचा उपयोग तात्पुरता स्वरूपात का होईना करणे शक्य आहे. या शेती प्रात्यक्षिक केंद्रांना बारमाही पाणीपुरवठा सध्या कोठेही उपलब्ध नाही. तथापी ब-याच ठिकाणी हंगामी बागायत होण्याची दाट शक्यता आहे. याबाबत मते अजमावली असता असे आढळून आले की विहीर बागायत ही ५१ टक्के कृषि प्रात्यक्षिक केंद्रांनाउपयुक्त ठरेल. त्यामुळे आश्रमशाळेतील जमिनीचे थोडया फार प्रमाणात का होईना, बागायत करण्याची आज जरूरी आहे.

... १९

३.९ शेतीची अवजारे व पशुधन :

कृषि प्रात्यक्षिक केंद्रावर शेतीसाठी आवश्यक असलेली बरीचशी अवजारे आज उपलब्ध आहेत. परंतु ती नादुरुस्त असून तशीच कित्येक वर्षा - पासून पडून आहेत. १० केंद्रातील ऑईल इंजिन व १३ इलेक्ट्रीक मोटार आश्रम-शाळांच्या ताब्यात आहेत व त्यांचा उपयोग सध्या शेतीसाठी न करता आश्रम-शाळांच्या इतर कामासाठी केला जातो. नांगर, बैलगाडया, डस्टर व स्प्रेअर इ. अवजारे तशीच पडून आहेत. कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील असलेल्या अवजारांची संख्या खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्र.	अवजारांचे नांव	संख्या
१.	नांगर	६६
२.	ऑईल इंजिन	१०
३.	इलेक्ट्रीक मोटार	१३
४.	कुळव	४२
५.	पाबर	२९
६.	डस्टर	४४
७.	स्प्रेअर	४८

अशी महत्वाची अवजारे कृषी प्रात्यक्षिक केंद्राकडे अद्यापही नादुरुस्त अवस्थेत पडून आहेत.

पशुधनाच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की फारच थोडया आश्रम-शाळेजवळ बैलजोडया आहेत. गाईचे प्रमाण तर आता जवळजवळ नाहीसे झालेले आहे. शेतीची वर उल्लेख केलेली अवजारे आहेत ती जनावरांसाठी बांधलेल्या गोठयात उघडया अवस्थेत व काहीही नोंद न करता पडलेली आहेत. जनावरां-साठी ब-याच आश्रमशाळेत गोठे बांधलेले आहेत. हे गोठे आज भग्न अवस्थेत

....२०

दिसत असून त्याची दुरुस्ती देखभाल असा काहीही उपक्रम झालेला दिसत नाही.

३.१० कृषि प्रात्यक्षिक केंद्रावर घेतली जाणारी पिके :

कृषी प्रात्यक्षिक केंद्रावर भौगोलिक परिस्थितीनुसार व त्या भागातील हवामानात अनुसरून पिके घेण्यात आलेली आहेत. या बाबतीत कृषि प्रात्यक्षिक केंद्र ही तोटयात येत असल्याने बंद करण्यात यावी असा बरासचा कल वरीष्ठ पातळीचा दिसतो. यासाठी खालील बाबी निदर्शनास आणणे आवश्यक आहे असे वाटते. या प्रात्यक्षिक केंद्राचा उपयोग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व त्या भागातील आदिवासींना मार्गदर्शनासाठी आहे व त्या प्रमाणे ते त्याचा लाभ घेत आहेत. त्यामुळे ही शिक्षणाची बाब व्यापारी दृष्टिकोनातून पहाणे संयुक्तीक होणार नाही. काही आश्रमशाळेमधील उत्पन्न व खर्चाचा अभ्यास केला असता उत्पन्न कमी होऊन खर्च अधिक असल्याचे आढळून आले आहे. या बाबतीत असे नमूद करावेसे वाटते की कृषि प्रात्यक्षिक केंद्रासाठी जो खर्च केला जातो तो सर्वच्या सर्व केंद्रातील उत्पन्नासाठी झालेला नसतो. भांडवली अनुदानाचा खर्च त्यात समाविष्ट केला जातो. भांडवली अनुदानांचा खर्च फार मोठा असल्याने कृषि प्रात्यक्षिक केंद्र हा तोटयात आहेत असा अभास निर्माण होतो. उत्पन्न व खर्च याचा शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून अभ्यास केल्यास अशा आश्रमशाळा तोटयात नाहीत असे आढळले. काही आश्रमशाळेत उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होत असेल तरी या योजनेची उपयुक्तता सामाजिक दृष्टिकोनातून पाहून हा उपक्रम पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे असे नमूद करावेसे वाटते.

३.११ शेती व्यवस्थापन :

शेती व्यवस्थापन हे एक मोठे शास्त्र आहे. हे शास्त्र ब-याच गोष्टींवर अवलंबून आहे. आश्रमशाळेसारख्या सामाजिक क्षेत्रात या शास्त्राचा फार काटेकोरपणे उपयोग करून घेतला पाहिजे, तसा उपयोग सध्या तरी केला गेलेला दिसत नाही असे निदर्शनास येते आणि त्यामुळे कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची फलश्रुती आपणास पहावयास मिळत नाही. सध्या आश्रमशाळेतील व्यवस्थापन अतिशय निकृष्ट आहे आणि त्यात सुधारणा होण्याची आजची

खरी गरज आहे.

३.१२ कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील उणीवा :

१. कृषि केंद्रातील ब-याचशा जमिनी हया अवर्षणग्रस्त व अति पावसाच्या भागात आहेत. त्यामुळे केव्हा अतिवृष्टिने पिके येत नाहीत तर केव्हा अनावृष्टिमुळे पिकांचा नाश होतो. सर्व जमिनी या सर्वस्वी नैसर्गीक पाण्यावर अवलंबून आहेत. जिरायत पिके बागायती करण्याबाबतचा प्रयत्नही दिसत नाही.

२. महसूल व वन खात्याकडून ज्या जमिनी मिळाल्या आहेत त्या अविकसित आहेत. त्यापैकी ब-याचशा जमिनी लागवडीखाली आणलेल्या दिसत नाहीत. अशा जमिनींची पोतही फार कमी आहे. या जमिनीच्या सुधारणेसाठी शेणखताचा किंवा कंपोस्ट खताचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही त्यामुळे तिची उपज शक्ती फार कमी आहे. या जमिनीत चढ-उतार असल्यामुळे या जमिनीचे बांधबांधस्ती व सपाटीकरण न झाल्याने योग्य प्रकारे पिकांचे उत्पन्न होत नाही.

३. ही कृषि प्रात्यक्षिक केंद्र बहुतेक वन भागात किंवा त्याचे जवळपास असल्याने मोकाट जनावरांचा फारच उपद्रव होतो. अशा प्रात्यक्षिक केंद्रातील पिकाऊ जमिनींना कुंपणाची आवश्यकता असते. परंतु तसे कुंपण घालण्याचा प्रयत्नही झालेला नाही किंवा फारसे कुंपण कोठेच घातलेले दिसत नाही.

.... २२

४. कृषि प्रात्यक्षिक केंद्रासाठी दैनंदिन बाबींवर होणारा खर्च तेथे असणा-या अधिका-यांच्या कक्षेत नसल्यामुळे वेळोवेळी त्याला हा खर्च मंजूर करून घेण्यासाठी वरिष्ठ अधिका-यांकडे जावे लागते. शेतीच्या बाबतीत वेळीच निर्णय घेणे हे जरुरीचे असते असे निर्णय घेण्यासाठी त्या ठिकाणी असणा-या अधिका-याला हक्क नसल्यामुळे शेती पध्दतशीर होऊ शकत नाही हा या व्यवस्थापनातील मोठा दोष आहे. ब-याच बाबी तेथील अध्यापकांना आपल्या पतीवर आणाव्या लागतात. केंव्हा केंव्हा या बाबी पतीवरही उपलब्ध होऊ शकत नाहीत.

५. आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्रे बंद असण्याची कारणे विचारली असता खालील बाबी सांगण्यात आल्या :

१. कृषि खात्याकडून कर्मचारी संबंधीत खात्याकडे वर्ग झाल्या नंतर त्या ठिकाणी अन्य अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली नाही आणि ती पदे तशीच रिक्त आहेत.

२. कृषि प्रात्यक्षिक केंद्रास आवश्यक असलेले पशुधन, अवजारे, बी-बियाणे, खते ही वेळेवर मिळत नाहीत.

३. कृषि प्रात्यक्षिक केंद्रास आवश्यक असलेली आर्थिक मदत वेळेवर मिळत नाही.

प्र क र ण चौ थे

आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्राबाबत काही सूचना व शिफारशी.

महाराष्ट्र राज्यात ५१ प्रात्यक्षिक कृषि केंद्र आश्रमशाळांना जोडलेली आहेत. हया कृषि प्रात्यक्षिक केंद्रे सुधारण्याबाबत किंवा त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी काही सूचना व शिफारशी खालीलप्रमाणे करण्यात येत आहेत.

१. कृषी प्रात्यक्षिक केंद्र आश्रमशाळांना जोडण्याचा मूळ उद्देश असा होता की, या शाळा अति दुर्गम भागात बसलेल्या आहेत. या अतिदुर्गम भागात शेतीबाबत अद्यावत ज्ञान त्या भागातील शेतक-यांपर्यंत पोहयत नाही असे शेतीविषयक अद्यावत ज्ञान पोहोचविण्याची जबाबदारी या केंद्रावर सोपविण्यात आली होती. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शेतीविषयी शिक्षण किंवा ज्ञान यावे व त्याद्वारे आदिवासी भागात शेती सुधारणा करावी असा होता. तसेच कृषि प्रात्यक्षिक केंद्र आश्रमशाळांना जोडल्यामुळे या शेती प्रात्यक्षिक केंद्रातून निघणारा भाजीपाला, सरपण, फळे, अन्नधान्य, यांचा उपयोग त्या शाळेतील आश्रमशाळांना व्हावा, शेती प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळांचे उद्देश इतर आश्रमशाळांपेक्षा वरचेवर वैशिष्ट्यपूर्ण व वेगळे होते. हा उद्देश सफल होण्याच्या दृष्टिने शासनाने १९७२ पासून ही योजना अंमलात आणली. या पाहणीत आढळलेल्या व मिळालेल्या माहितीच्या आधारावर पुढीलप्रमाणे सुचना/ शिफारशी करण्यात येत आहेत.

४.१ या सर्व आश्रमशाळांचे पुनर्वसन करून त्याला नवे स्वरूप प्राप्त करून या प्रात्यक्षिक केंद्रांचे उपरोक्त उद्देश सर्वतोपरी साध्य होण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. या कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळा बंद न करता किंवा दुस-या अन्य खात्याकडे स्थलांतरीत न करता त्याच

खात्याकडे आश्रमशाळा ठेवाव्यात.

४.२ महाराष्ट्र राज्यात १९७२ च्या शासन निर्णयान्वये आश्रमशाळेला जोडून कृषी प्रात्यक्षिक केंद्र, बालवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन केंद्र, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र इ. बाबी असलेले प्रकल्प आदर्श प्रकल्प म्हणून राबविले पाहिजेत. याबाबत मध्यप्रदेश राज्यात व चंद्रपूर जिल्हयात काही खाजगी संस्थांनी प्रयोग केलेले आहेत व ते ब-याचशा प्रमाणात यशस्वी झालेले आहेत.

४.३ अयापपावेतो आश्रमशाळांना किती जमिन आहे, कोणत्या प्रकारची जमिन आहे किंवा मालकी हक्क कोणाचा आहे, याबाबत ७/१२ मध्ये ब-याचशा ठिकाणी नोंदी झालेल्या नाहीत, अशा नोंदी ताबडतोब करून घेतल्या पाहिजेत. यासंबंधीचे दस्तऐवज करून घेणे आवश्यक आहे.

४.४ ब-याच ठिकाणी अशा जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहेत. ही अतिक्रमणे ताबडतोब काढून पुढे अतिक्रमण होणार नाहीत याची दखल घेतली पाहिजे.

४.५ या शाळा योग्य त-हेने चालविण्यासाठी आदिवासी विकास संचालनालयात एक अधिकारी या कामासाठी नियुक्त करणे आवश्यक आहे. कृषि प्राथमिक केंद्र शाळांचे नियोजन व अंमलबजावणीसाठी हया अधिका-याकडे हे काम सुपूर्त करावे. त्यामुळे या अधिका-याची सर्वस्वी जबाबदारी संपूर्ण कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या आश्रमशाळांचे नियोजन करणे,, योग्य त्यावेळी साहित्याचा पुरवठा करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे इ. बाबी त्यांच्याकडे राहतील. कमीत कमी दहा आर. जमिन कृषि प्रात्यक्षिक केंद्रांनाही मिळाली तरी अशी कृषि प्रात्यक्षिक केंद्रे त्या शाळांना सुरु

करता येतील. यासाठी शेतकी खात्याकडून विशेष मदत मिळविता येईल. ज्या ठिकाणी जमिनी उपलब्ध होतील तेथे एकापेक्षा प्रात्यक्षिक केंद्रे सुरू करण्यात यावी.

४.६ शेती प्रात्यक्षिक केंद्र - व्यवस्थापन :

शेती व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे शिफारशी सुचविण्यात येत आहेत.

१. कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या प्रत्येक आश्रमशाळेला १ शेतकी मदतनीस, २ सालदार, १ माळी या जागा निर्माण करून त्या भरल्या पाहिजेत. यापूर्वी १ शेती अधिकारी १ सालदार, २ माळी अशी पदे निर्माण करण्यात आली होती. यामध्ये शेतकी अधिकाऱ्याऐवजी शेतकी सहाय्यक हे पद निर्माण करावे, असे सुचित करण्यात येत आहे व शेतकी अधिकाऱ्याचे पद हे आदिवासी विकास अधिकाऱ्याच्या कार्यालयाशी संलग्न ठेवावे. म्हणजे शेतकी अधिकारी हा आदिवासी विकास अधिकाऱ्याच्या क्षेत्रातील सर्व आश्रमशाळांना तांत्रिक मार्गदर्शन करू शकेल. या शेतकी अधिकाऱ्याची पदे नियुक्तीने न घेता खात्याने निर्माण करावीत व ती खात्याने भरावीत. त्यासाठी वरिष्ठ पातळीवरून नियमितपणे देखरेख असली पाहिजे.

२. कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळेत मुख्याध्यापक हा प्रमुख असल्यामुळे मुख्याध्यापकांच्या हाताखाली शेतकी सहाय्यक काम करू शकेल तसेच शेतकी सहाय्यक हा मुलांना शिकविण्याचेही काम करू शकेल व त्यांच्यावर मुख्याध्यापकाची देखरेख राहील.

३. शेतीसाठी व मजूरांना देण्यासाठी दैनंदिन रोकड रकमेची नेहमी आवश्यकता भासते. ती रोकड रक्कम शाळेकडे असली पाहिजे. त्या दृष्टिने यासाठी मुख्याध्यापकांना काही रक्कम खर्च करण्याचे अधिकार प्रदान केले पाहिजेत.

४. जमिनीच्या क्षेत्रानुसार व त्या ठिकाणी घेतल्या जाणा-या पिकानुसार आकस्मिक खर्चाची रक्कम मुख्याध्यापकांकडे ठेवण्यात यावी.

५. या शाळेवर देखरेख ठेवण्यासाठी १ शेतकी अधिकारी आदिवासी विकास अधिका-याच्या कार्यालयात असावा.

४.७ सध्या ब-याचशा आश्रमशाळांच्या इमारती पडीक झालेल्या आहेत. त्यांची दुरूस्ती, देखभाल, केली गेली नाही तर त्या काही दिवसांनी उध्वस्त होण्याची फार शक्यता आहे. या जमिनीची पाहणी करून त्यांची दुरूस्ती करून त्याचा उपयोग चांगला करून घेतला पाहिजे. शेतीविषयक जी अवजारे आश्रमशाळेत आहेत ती पण दुरूस्त करून शेतीच्या कामासाठी त्याचा उपयोग केला पाहिजे.

४.८ <u>शेती विकास</u> :

आश्रमशाळांतील सर्व जमिनी विकासासाठी एकाचवेळी न घेता त्या टप्प्याटप्प्यांनी घेतल्या पाहिजेत.

१. ज्या आश्रमशाळांच्या जमिनी चांगल्या आहेत, त्या आश्रमशाळेंच्या जमिनींना प्राधान्य देऊन त्यांचा विकास प्रथम घडवून आणला पाहिजे.

२. खडकाळ व हलक्या प्रतीची जमिन आहे, अशा जमिनीचा वापर चांगल्या पध्दतीने कसा करता येईल त्याचा नीटपणे अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

३. काही आश्रमशाळांमध्ये सामाजिक वनीकरण, फलोयान विभागाकडून बरीचशी झाडे लावली गेली आहेत, त्यापैकी काही झाडे जिवंत आहेत व काही झाडे मेल्यामुळे जमिन तशीच पडीक आहे. अशा पडीक जमिनीवर पुन्हा झाडे लावण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ~~केले गेले पाहिजेत.~~ जी झाडे जिवंत आहेत, अशा झाडांची जोपासना करून त्यांचा चोरटया वृक्ष-तोडी पासून बचाव केला पाहिजे. फलोयान विभागाकडून लागवड करण्यात आली आहेत, अशा झाडांकडे खास लक्ष देऊन त्यापासून उत्पन्नात भर कशी घालता येईल, हे पाहिले पाहिजे. ब-याच ठिकाणी आश्रमशाळांना इंधनाचा फार मोठा तुटवडा भासतो. त्यावेळी या सरपणाचा उपयोग बहुमोल ठरेल. जेथे शक्य असेल तेथे फळझाडांची लागवडीवर भर दिला पाहिजे.

४. सध्या शेती खाते, कृषि विद्यापीठे, फलोयान विभाग, सामाजिक वनीकरण यांचेमध्ये समन्वय दिसत नाही. विद्यापीठाकडून शिफारस केलेले बि-बियाणे, आश्रमशाळेतील प्रात्यक्षिक केंद्रांना मिळत नाही किंवा प्रशिक्षण व भेट खात्यातील अधिकारी या आश्रमशाळांना भेटी देऊन मार्गदर्शन करीत नाहीत. किंवा त्यासाठी प्रात्यक्षिके घेतली जात नाहीत अशा भेटी आवश्यक आहेत.

५. कृषी खात्याकडून प्रात्यक्षिक केंद्रासाठी मदत दिली जाते ती मदत या आश्रमशाळांना मिळत नाही, त्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

४.९ कृषि प्रात्यक्षिक केंद्राचे आश्रमशाळांचे दीर्घ मुदतीचे नियोजन फार आवश्यकआहे. ते सध्या दिसत नाही. अशा आश्रम - शाळेसाठी दीर्घ मुदतीचे नियोजन करण्यात यावे.

४.१० या सर्व बाबींवर संचालनालय स्तरावरुन चांगली देखरेख झाली पाहिजे.

४.११ ज्या आश्रमशाळेत पाणी उपलब्ध आहे, त्या ठिकाणी थोडा फार खर्च करून पाणी उपलब्ध करून दिले पाहिजे. कोरडवाहू जमिनीचे रूपांतर बागायती जमिनीत केले पाहिजे. ब-याच ठिकाणी मोकाट जनावरांपासून पिकांचे नुकसान होते. अशा ठिकाणी कुंपणाची व्यवस्था प्राधान्याने केली पाहिजे. अशा जमिनीचे सपाटीकरण व बांध बंदिस्तीचे काम संबंधीत खात्याकडून करून घेतले पाहिजे.

४.१३ कृषि प्रात्यक्षिक केंद्रात, दुग्ध व्यवसायासाठी गाई, म्हशी बैल यांचा समावेश केला पाहिजे. या जनावरांपासून मिळणा-या शेणापासून एखादा गोबरगॅस यंत्रसंच सुरु करावा.

४.१२ आश्रमशाळेत बहुतांशी भाजीपाला लागवडीला प्रोत्साहन दिले जाते. हा उत्पादित भाजीपाला इतर आश्रमशाळांना स्वत:ची गरज भागवून पुरविता आला पाहिजे.

४.१४ आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत कार्यानुभवासाठी शेती हा विषय सक्तीचा असावा.

४.१५ आश्रमशाळांमध्ये वारंवार मेळावे भरवून त्या भागातील पिकांची प्रात्यक्षिके दाखविली पाहिजेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे व पालकांचे शाळेतील संबंध दृढावतील व त्या भागातील आदिवासी शेतक-यांमध्ये शेती विषयीचे अद्यावत ज्ञानात भर पडेल व त्याचा प्रसार होईल.

.....

परिशिष्ट क्र. १

कृषि प्रात्यक्षिक केंद्र असणाऱ्या शासकीय आश्रमशाळांची यादी.

[१] नाशिक जिल्हा	संबंधित आदिवासी विकास अधिकाऱ्याचे क्षेत्र.
१. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, बोरीवाडा ता. पेठ, जि. नाशिक.	नाशिक
२. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, टिटवे ता. दिंडोरी. जि. नाशिक.	नाशिक
३. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, चणकापूर ता. कळवण, जि. नाशिक.	~~कळवण~~ कळवण
४. शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, मोहनदरी ता. कळवण, जि. नाशिक.	~~कळवण~~ कळवण
५. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, अंबुपाडा, ता. सुरगाणा, जि. नाशिक	~~कळवण~~ कळवण
६. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, पळसन, ता. सुरगाणा, जि. नाशिक.	~~कळवण~~ कळवण
७. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, माणी ता. सुरगाणा, जि. नाशिक.	~~कळवण~~ कळवण
[२] ठाणे जिल्हा	
८. शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, उपलाट ता. तलासरी, जि. ठाणे.	डहाणू
९. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, सवणे ता. तलासरी, जि. ठाणे.	डहाणू

१०.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, कारेगांव ता. मोखाडा, जि. ठाणे.	शहापूर
११.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, पळसुंडे, ता. मोखपाडा, जि. ठाणे.	शहापूर

[३] रायगड जिल्हा

१२.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, कोळघर, ता. अलिबाग, जि. रायगड.	ठाणे

[४] धुळे जिल्हा

१३.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, ढोंगसाळी, ता. नवापूर, जि. धुळे.	नंदूरबार
१४.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, वाघाळे, ता. नंदूरबार, जि. धुळे.	नंदूरबार
१५.	शासकीय पोस्टबेसिकआश्रमशाळा, धुलवड ता. अक्राणी, जि. धुळे.	तळोदा
१६.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, मांडणी, ता. अक्राणी, जि. धुळे.	तळोदा
१७.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, भांगरापाणी ता. अक्कलकुवा, जि. धुळे.	तळोदा
१८.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, लोभाणी ता. तळोदा, जि. धुळे.	तळोदा

[५] जळगांव जिल्हा

१९.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, वैजापूर, ता. पोपडा, जि. जळगांव.	जळगाव

....३२

२०.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, लालमाती, ता. रावेर, जि. जळगाव.	जळगांव
२१.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, वाघीझरा ता. यावल, जि. जळगांव.	जळगांव
२२.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, जोधनखेडा ता. एदलाबाद, जि. जळगांव.	जळगांव

[६] औरंगाबाद जिल्हा

२३.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, वडनेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.	औरंगाबाद
२४.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, नागद ता. कन्नड, जि. औरंगाबाद.	औरंगाबाद

[७] बिड जिल्हा

२५.	शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, भोडाळा ता. आष्टी, जि. बिड.	औरंगाबाद

[८] पुणे जिल्हा

२६.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, गोहे बु. ता. आंबेगाव, जि. पुणे.	पुणे.
२७.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, खिरेश्वर, ता. जुन्नर, जि. पुणे.	पुणे
२८.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, सोनावळे ता. जुन्नर, जि. पुणे	पुणे.

[९] कोल्हापूर जिल्हा

२९.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, बोरबेट ता. गगनबावडा, जि. पुणे.	पुणे

....३३

[१०] सातारा जिल्हा

३०.	शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, बामणोली, ता. जावळी, जि. सातारा.	पुणे

[११] नगर जिल्हा

३१.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, मवेशी, ता. अकोला, जि. अहमदनगर.	राजूर
३२.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, केळी रुमणवाडी ता. अकोला, जि. अहमदनगर.	राजूर
३३.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, केळीकोतुळ ता. अकोला, जि. अहमदनगर	राजूर

[१२] अमरावती जिल्हा

३४.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, चिखली, ता. चिखलदारा, जि. अमरावती.	अमरावती

[१३] नांदेड जिल्हा

३५.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, सारखनी, ता. किनवट, जि. नांदेड.	नांदेड
३६.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, पाटोदा, ता. किनवट, जि. नांदेड.	नांदेड
३७.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, जलधारा, ता. किनवट, जि. नांदेड.	नांदेड
३८.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, सहस्त्रकुंड ता. किनवट, जि. नांदेड.	नांदेड
३९.	शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, बोथली, ता. किनवट, जि. नांदेड.	नांदेड

....३४

[१४] भंडारा जिल्हा

४०.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, कडोकसा, ता. देवरी, जि. भंडारा.	गोंदीया
४१.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, बोरगांव ता. देवरी जि. भंडारा.	गोंदिया

[१५] गडचिरोली जिल्हा

४२.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, कसनसूर ता. इटापल्ली, जि. गडचिरोली.	अहेरी
४३.	शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, झिंगानूर, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली.	अहेरी
४४.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, कोरची ता. कुरखेडा, जि. गडचिरोली.	गडचिरोली
४५.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, कोटगुळ ता. धानोरा, जि. गडचिरोली.	गडचिरोली
४६.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, रामगड ता. कुरखेडा, जि. गडचिरोली.	गडचिरोली

[१६] यवतमाळ जिल्हा

४७.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, बोटोणी ता. मारेगांव, जि. यवतमाळ.	यवतमाळ
४८.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, हिवरी, ता. यवतमाळ , जि. यवतमाळ.	यवतमाळ
४९.	शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, चिंचघाट, ता. यवतमाळ, जि. यवतमाळ.	यवतमाळ

[१७] नागपूर जिल्हा

५०. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, खेलदा, ता. रामटेक, जि. नागपूर. — नागपूर

[१८] वर्धा जिल्हा

५१. शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा, नवरगांव ता. सेलू, जि. वर्धा — नागपूर

.....

परिशिष्ट क्र. २

जिल्हानिहाय शासकीय आश्रमशाळा व कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची संख्या

अ.क्र.	जिल्हा	शासकीय आश्रमशाळा			शेती प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळा		
		उपयोजना क्षेत्रात	उपयोजना क्षेत्राबाहेर	एकूण	उपयोजना क्षेत्रात	उपयोजना क्षेत्राबाहेर	एकूण
१	२	३	४	५	६	७	८
				सह्याद्री विभाग			
१.	नाशिक	४८	३	५१	७	–	७
२.	ठाणे	५५	२	५७	४	–	४
३.	रायगड	२	५	७	–	१	१
४.	रत्नागिरी	–	२	२	–	–	–
५.	धुळे	५१	३	५४	६	–	६
६.	पुणे	९	५	१४	३	–	३
७.	कोल्हापूर	–	१	१	–	१	१
८.	सातारा	–	२	२	–	१	१
९.	सोलापूर	–	१	१	–	–	–
१०.	नगर	१०	३	१३	–	३	३
११.	जळगांव	४	६	१०	३	१	४
१२.	औरंगाबाद	–	३	३	–	२	२
१३.	बीड	–	३	३	–	१	१
	एकूण	१७९	३८	२१७	२३	१०	३३

१	२	३	४	५	६	७	८
				गोंडवन विभाग			
१.	नागपूर	१	४	५	१	–	१
२.	वर्धा	–	५	५	–	१	१
३.	अमरावती	१३	३	१६	१	–	१
४.	अकोला	–	२	२	–	–	–
५.	बुलढाणा	–	३	३	–	–	–
६.	यवतमाळ	१५	६	२१	२	१	३
७.	नांदेड	९	३	१२	४	१	५
८.	परभणी	–	३	३	–	–	–
९.	भंडारा	७	२	९	२	–	२
१०.	गडचिरोली	३२	–	३२	५	–	५
११.	चंद्रपूर	८	१	९	–	–	–
	एकूण	८५	३२	११७	१५	३	१८
	महाराष्ट्र	२६४	७०	३३४	३८	१३	५१

परिशिष्ट क्र. ३

कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील मिळालेल्या जमिनीचे क्षेत्र विभागनिहाय (क्षेत्र हेक्टरात)

अ.क्र.	जिल्हा	कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या शाळांची संख्या	कृषि प्रात्यक्षिक केंद्रास मिळालेल्या जमिनीचे वर्गीकरण (क्षेत्र हेक्टर)				एकूण मिळालेल्या क्षेत्रापैकी सामाजिक वनीकरण व फलोद्यान खालील क्षेत्र.
			महसूल खाते	वन खाते	खाजगी व इतर	एकूण	
१	२	३	४	५	६	७	८
				सह्याद्री विभाग			
१.	नाशिक	७	१४.९७	७९.१०	१५.३४	१०९.४१	४६.५०
२.	ठाणे	४	–	६०.८०	–	६०.८०	८.००
३.	रायगड	१	१८.३०	–	–	१८.३०	१६.००
४.	धुळे	६	१७.४२	२६.६०	३.८३	४७.८५	६०.२७
५.	जळगांव	४	–	८५.६०	–	८५.६०	२०.००
६.	बीड	१	२०.१८	–	–	२०.१८	१८.९३
७.	औरंगाबाद	२	३२.६०	–	–	३२.६०	१८.००
८.	पुणे	३	–	–	२६.०६	२६.०६	१०.००
९.	कोल्हापूर	१	२४.००	–	–	२४.००	–
१०.	सातारा	१	–	१९.४५	–	१९.४५	१७.४७
११.	नगर	३	६९.१९	–	–	६९.१९	२१.६३
	एकूण	३३	१९६.६६	२७१.५५	४५.२३	५१३.४४	१८३.८०
	टक्केवारी		(३८)	(५३)	(९)	(१००)	(३६)

१	२	३	४	५	६	७	८
				गोंडवन विभाग			
१.	नांदेड	५	१०१.७८	–		१०१.७८	५९.८८
२.	अमरावती	१	–	२४.00	–	२४.00	१६.00
३.	भंडारा	२	२२.७५	२४.00	–	४६.७५	३०.५१
४.	गडचिरोली	५	५७.३२	४२.५०	–	९९.८२	५२.२०
५.	यवतमाळ	३	२२.३०	४४.00	–	६३.३०	३८.00
६.	नागपूर	१	२४.३८	–	–	२४.३८	३.00
७.	वर्धा	१	–	२०.00	–	२०.00	–
	एकूण –	१८	२३८.५३	१५४.५०	–	३८३.०३	१९९.५९
	टक्केवारी		(६०)	(४०)	–	(१००)	(५२)
	महाराष्ट्र	५१	४२५.१९	४२६.०५	४५.२३	८९६.४७	३८३.३९
	टक्केवारी		(४७)	(४८)	(५)	(१००)	(४३)

परिशिष्ट क्र. ४

कृषि प्राथमिक केंद्रामधील जमीनीचे दर्जानुसार व क्षेत्रप्रमाणे वर्गीकरण.

(क्षेत्र हेक्टरात)

अ.क्र.	जिल्हा	कृषिप्राथमिक केंद्र असलेल्या शाळांची संख्या	शाळेच्या ताब्यातील जमीनीचे एकूण क्षेत्र	प्राथमिक केंद्राच्या जमीनीचे दर्जानुसार क्षेत्र: भारी (शेतीस योग्य)	मध्यम (शेतीस योग्य)	हलकी (शेतीस अयोग्य)	खडकाळ (शेतीस अयोग्य)	एकूण (शेतीस अयोग्य)	इमारत / प्रांगणे इ. ताठी ठेवलेले क्षेत्र.
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
				सह्याद्री विभाग					
१.	नाशिक	७	१०९.४१	८.३४	३१.२८	३९.९७	७.२०	८६.७९	२२.६२
२.	ठाणे	४	६०.८०	८.००	१६.००	८.००	१८.६४	५०.६४	१०.१६
३.	रायगड	१	१८.३०	..	..	..	१६.००	१६.००	२.३०
४.	धुळे	६	४७.८५	..	१०.८०	८.२५	१०.९३	२९.९८	१७.८७
५.	जळगांव	४	८५.६०	२८.७०	१६.५०	१२.००	०.६०	५७.८०	२७.८०
६.	बीड	१	२०.१८	४.००	३.६०	११.३३	..	१८.९३	१.२५
७.	औरंगाबाद	२	३२.६०	६.००	८.००	१४.००	..	२८.००	४.६०
८.	पुणे	३	२६.०६	..	६.४०	१२.००	४.२३	२२.६३	३.४३
९.	कोल्हापूर	१	२४.००	..	..	..	२१.६०	२१.६०	२.४०
१०.	सातारा	१	१९.४५	..	..	१८.८५	..	१८.८५	०.६०

१	२	३	४	५	६	७	८	९	१०
११.	नगर	३	६९.१९	२.००	३१.२९	१४.५०	१२.४५	६०.२४	८.९५
	एकूण	३३	५१३.४४	५७.०४	१२३.८७	१३८.२०	२१.६५	४११.४६	१०१.२८
	टक्केवारी		(१००)	(१४)	(३०)	(३४)	(२२)	(१००)	(२०)
				गोंदवन विभाग					
१.	नांदेड	५	१०१.७८	२.६८	११.००	२६.००	३५.२०	७४.८८	२६.९०
२.	अमरावती	१	२४.००	१९.००	..	..	१.००	२०.००	४.००
३.	अकोला	२	४६.७५	..	२.००	३२.९१	२.००	३६.९१	९.८४
४.	गडचिरोली	५	९९.८२	..	११.५७	३३.५०	३३.४४	७८.५१	२१.३१
५.	यवतमाळ	३	६६.३०	..	३८.००	२२.००	..	५०.००	१६.३०
६.	नागपूर	१	२४.३८	..	..	१६.३८	..	१६.३८	८.००
७.	वर्धा	१	२०.००	८.००	१.००	६.००	१.००	१६.००	४.००
	एकूण	१८	३८३.०३	२९.६८	५३.५७	१३६.७९	७२.६४	२९२.६८	९०.३५
	टक्केवारी		(१००)	(१०)	(१८)	(४७)	(२५)	(१००)	(२४)
	महाराष्ट्र	५१	८९६.४७	८६.७२	१७७.४४	२७५.६९	१६४.२९	७०४.१४	१९२.३८
	टक्केवारी		(१००)	(१२)	(२५)	(३९)	(२४)	(१००)	(२१)

परिशिष्ट क्र. ५

बंद असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची कारणानुसार जिल्हानिहाय संख्या

अ.क्र.	जिल्हा	शेती प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या शाळांची संख्या	शेती प्रात्यक्षिक केंद्र बंद असलेल्या शाळांची संख्या	कारणामुळे बंद असलेल्या आश्रमशाळांची संख्या			
				तांत्रिक कर्मचारी अभाव	अवजारे, पशुधन व बी न मिळणे	पाण्याचे दुर्भिक्ष	अपुरी आर्थिक मदत.
१	२	३	४	५	६	७	८
			सह्याद्री विभाग				
१.	नाशिक	७	४	२	३	२	२
२.	ठाणे	४	४	..	२	२	१
३.	रायगड	१	१	..	..	१	..
४.	धुळे	६	६	२	२	१	३
५.	जळगांव	४	३	१	..	१	..
६.	बीड	१	१	..	..	१	..
७.	औरंगाबाद	२	२	..	..	२	..
८.	पुणे	३	३	२	२	१	१
९.	कोल्हापूर	१	१	..	..	..	..
१०.	सातारा	१	१	१	..	१	..
११.	नगर	३	३	३	..	३	१
	एकूण	३३	२९	११	९	१५	८

१	२	३	४	५	६	७	८
				गोंडवन विभाग			
१.	नांदेड	५	५	४	३	३	१
२.	अमरावती	१	१	१	..	..	..
३.	भंडारा	२	१	..	..	१	..
४.	गडचिरोली	५	५	३	१	३	२
५.	यवतमाळ	३	३	१	..	१	..
६.	नागपूर	१	..	..	..	..	..
७.	वर्धा	१	..	..	..	..	..
	एकूण	१८	१५	९	४	८	३
	महाराष्ट्र	५१	४४	२०	१३	२३	११

परिशिष्ट क्र. ६

बागायती सुविधा असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची जिल्हानिहाय संख्या

अ.क्र.	जिल्हा	शेती प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या शाळांची संख्या	बागायतीसाठी साधनांचा उपयोग घेत असलेल्या अभिक्षाळा				उपलब्ध पाणी वर्षभर पुरेसे आहे काय ?	शेती केंद्रावर अन्य ठिकाणी पाणी नागण्याची शक्यता	
			विहीर	नदी	नाला	कॅनाल		आहे	नाही
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
					सह्याद्री विभाग				
१.	नाशिक	७	४	१	३	..	नाही	६	१
२.	ठाणे	४	२	३	..	..	नाही	२	२
३.	रायगड	१	..	१	..	..	नाही	१	..
४.	धुळे	६	..	..	२	..	नाही	२	४
५.	नंदुरबार	४	२	२	..	..	नाही	१	३
६.	बीड	१	..	..	..	..	नाही	१	..
७.	औरंगाबाद	२	१	..	१	१	नाही	..	२
८.	पुणे	३	..	१	१	..	नाही	३	..
९.	कोल्हापूर	१	..	..	..	..	नाही	..	१
१०.	सातारा	१	..	..	..	..	नाही	१	..
११.	नगर	३	१	..	..	..	नाही	३	..
	एकूण	३१	१०	८	७	१	नाही	२०	१३

१	२	३	४	५	६	७	८	९	१०
					गोंडवन विभाग				
१.	नांदेड	५	१	..	..	..	नाही	१	४
२.	अमरावती	१	१	..	..	..	नाही	..	१
३.	भंडारा	२	१	..	..	..	नाही	१	१
४.	गडचिरोली	५	१	..	१	..	नाही	४	१
५.	यवतमाळ	३	..	..	१	..	नाही	३	..
६.	नागपूर	१	१	..	..	..	नाही	१	..
७.	वर्धा	१	..	..	..	..	नाही	१	..
	एकूण	१८	५	..	२	..	नाही	११	७
	महाराष्ट्र	५१	१५	८	९	१	नाही	३१	२०

परिशिष्ट क्र. ७

कृषि प्रात्यक्षिक केंद्रामधील जिल्हानिहाय उपलब्ध अवजारे व पशुधन संख्या

अ.क्र.	जिल्हा	उपलब्ध अवजारांची संख्या								उपलब्ध पशुसंवर्धन संख्या	
		नांगर	ऑईल इंजिन	इलेक्ट्रिक मोटार	कुळव	पाभर	बैलगाडी	ट्रक्टर	स्प्रेअर	बैल	गाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
						सहयाद्री विभाग					
१.	नाशिक	१४	४	३	५	४	५	८	८	२३	१
२.	ठाणे	३	..	१	..	..	२	२	१	..	..
३.	रायगड	३	१	..	..	..	२	..	१	..	..
४.	धुळे	४	१	..	४	३	२	४	४	१	..
५.	जळगांव	४	..	२	७	२	१	१	२	८	..
६.	बीड	२	..	..	..	..	१	२	४	..	..
७.	औरंगाबाद	२	..	..	२	२	२	१	..	..	..
८.	पुणे	५	..	..	१	१	१	१	४	..	..
९.	कोल्हापूर	..	..	..	..	..	..	..	..	..	..
१०.	सातारा	१	..	..	१	१	१	..	..	..	..
११.	नगर	४	..	३	१	१	२	२	३	२	..
	एकूण	४२	६	९	२१	१४	१९	२१	२७	३४	१

१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४
								गोंडवन विभाग															
१.	निर्मल	३	:	२	३	२	:	३	४	५	४	४	४	४	४	४	४	४	४	४	४	४	:
२.	अंबरनिपरे	३	:	:	३	:	:	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	५	:
३.	कुंडारा	२	:	:	२	२	:	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	:	:
४.	गडचिरोली	३	:	३	३	२	:	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	:	:
५.	पलसगाव	४	:	४	४	४	:	३	३	३	३	३	३	३	३	३	३	३	३	३	३	:	:
६.	नागभीड	२	:	:	२	:	:	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	:	:
७.	रुद्रा	२	:	:	२	:	:	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	२	:	:
	एकूण	२०	४	४	२०	४	४	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	२०	५	:
	महाराष्ट्र	३३	४	४	३३	४	४	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	२८	११	:

परिशिष्ट क्र. ८

कृषि प्रात्यक्षिक केंद्रावरील कर्मचारी संख्या

अ.क्र.	जिल्हा	येथे प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या शाळांची संख्या	प्रात्यक्षिक केंद्रावरील कर्मचारी संख्या			
			कृषि अधिकारी	माळी	सालदार	एकूण
१	२	३	४	५	६	७
			सहयाद्री विभाग			
१.	नाशिक	७	..	१	..	१
२.	ठाणे	४	..	..	..	..
३.	रायगड	१	..	..	..	..
४.	धुळे	६	१	..	..	१
५.	जळगांव	४	..	..	३	३
६.	बीड	१	..	..	..	..
७.	औरंगाबाद	२	..	..	..	..
८.	पुणे	३	..	..	१	१
९.	कोल्हापूर	१	..	..	..	..
१०.	सातारा	१	..	..	..	..
११.	नगर	३	..	..	२	२
	एकूण	३३	१	१	६	८

१	२	३	४	५	६	७
			गोंडवन विभाग			
१.	नांदेड	५	..	..	..	..
२.	अमरावती	१	..	..	..	..
३.	भंडारा	२	१	..	१	२
४.	गडचिरोली	५	..	..	१	१
५.	यवतमाळ	३	..	..	१	१
६.	नागपूर	१	१	..	१	२
७.	वर्धा	१	१	..	..	१
	एकूण	१८	३	..	४	७
	महाराष्ट्र	५१	४	१	१०	१५

परिशिष्ट क्र. ९

उपलब्ध इमारती व कुंपण सुविधा असलेल्या कृषि प्राथमिक केंद्रांची जिल्हानिहाय संख्या

अ.क्र.	जिल्हा	शेती प्राथमिक केंद्र असलेल्या शाळांची संख्या	इमारती उपलब्ध असलेल्या केंद्रांची संख्या				इमारतीची दुरुस्ती आवश्यक असणाऱ्या केंद्रांची संख्या	कुंपण सुविधा असलेल्या केंद्रांची संख्या.
			जनावरे	मजुर	अवजारे	शेतीमाल		
१	२	३	४	५	६	७	८	९
			सहयाद्री विभाग					
१.	नाशिक	७	६	२	७	४	३	१
२.	ठाणे	४	२	–	–	–	१	–
३.	रायगड	१	–	–	–	–	–	–
४.	पुणे	६	१	–	–	१	–	१
५.	जळगांव	४	४	–	–	२	३	–
६.	बीड	१	१	–	–	–	–	–
७.	औरंगाबाद	२	२	–	१	१	१	–
८.	पुणे	३	१	–	१	१	२	–
९.	कोल्हापूर	१	–	–	–	–	–	–
१०.	सातारा	१	१	–	–	–	१	–

(२)

१	२	३	४	५	६	७	८	९
११.	नगर	३	१	–	–	–	–	–
	एकूण –	३३	१९	३	७	९	११	२
				गोंडवन विभाग				
१.	नांदेड	५	२	–	–	–	–	–
२.	अमरावती	१	१	–	१	१	१	–
३.	भंडारा	२	–	–	–	–	–	–
४.	गडचिरोली	५	४	२	१	१	१	–
५.	यवतमाळ	३	२	१	२	२	१	–
६.	नागपूर	१	१	१	१	१	–	–
७.	वर्धा	१	१	–	१	–	१	–
	एकूण –	१८	११	४	६	५	४	–
	महाराष्ट्र –	५१	३०	७	१३	१४	१५	२